शुक्रवार, २ सप्टेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक ४६
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

कंत्राटी सरकारला बाप्पाने खाली खेचले -नारायण राणे/२

पनवेलमध्ये गणपती बाप्पांचे नियोजनबद्धरित्या विसर्जन/३

प्रेम प्रकरणातून तरुणाने स्वत:ला पेटवून घेतले/५

## भ्रष्टाचाऱ्यांपासून जनतेने सावध रहावे -पंतप्रधान



**कोची** : पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या केरळ दौऱ्यावर आहेत. कोची येथे भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. यानंतर पंतप्रधान मोदींनी कोचीच्या जनतेला संबोधित करताना विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी विरोधी पक्ष एकत्र येत असल्याचा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान मोदी म्हणाले, विकास आणि तरुणांच्या आकांक्षांच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध निर्णायक लढा देण्याची वेळ आली आहे असे मी १५ ऑगस्टला म्हटले होते, परंतु भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई होत असताना देशाच्या राजकारणातही नवे ध्रुवीकरण सुरू झाल्याचे आपण पाहात आहोत. भ्रष्ट आणि भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी काही राजकीय पक्ष उघड्यावर आले आहेत. संघटित होण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यापासून देशातील जनतेला सतत सावध रहावे लागेल, असे सांगितले.

# यूएसएने राज्यात गुंतवणुकीसाठी पुढाकार घ्यावा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सिनेटरच्या सदस्यांसोबत चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिकेच्या जॉर्जीया स्टेटचे (सिनेटर) वरिष्ठ प्रतिनिधीगृहाचे सदस्य जॉन ऑसोफ, वाणिज्यदूत माईक हॅन्की यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने गुरुवारी (दि. १) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या वेळी उभय देशांतील औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संबंध वृद्धींगत करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. राज्यातील ऊर्जा क्षेत्र, कृषी तंत्रज्ञान आणि कौशल्य विकास या क्षेत्रात गुंतवणुकीसाठी अमेरिकन उद्योजकांना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आमंत्रित केले.



या वेळी राज्याशी संबंधित विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. यात वैद्यकीय शिक्षणासाठी जॉर्जीया येथे भारतातील सर्वाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. राज्यातील औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय परिस्थिती या सर्व बाबींवर चर्चा करण्यात आली.

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी, मुंबईची हे देशाच्या आर्थिक राजधानीबरोबरच सांस्कृतिक राजधानी म्हणूनही ओळख आहे. महाराष्ट्र हे उत्पादन, तंत्रज्ञान आणि स्टार्टअप क्षेत्रात अग्रगण्य आहे. भारतात येत असलेली अमेरिकन गुंतवणूक ही राज्यात मोठ्या प्रमाणात येत आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार संशोधन आणि कौशल्य विकास यावर भर देण्यात येत आहे. राज्यात असलेल्या अनेक शैक्षाणिक संस्था आणि त्यातून तयार होत असलेल्या कुशल मनुष्यबळासाठी संधी निर्माण होणे आवश्यक आहे. सॉफ्टवेअर निर्मिती आणि निर्यातीमध्येही राज्य आघाडीवर आहे. तंत्रज्ञान संशोधन या क्षेत्रात काम करण्यासाठी इतर देशांचे सहकार्य घेण्यात येत आहे. नुकतेच कॉर्नेल विद्यापीठासोबत या संदर्भात करार झाला असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

राज्यासमोरील आव्हाने आणि संधी यावर चर्चेदरम्यान बोलतांना फडणवीस म्हणाले, वातावरणातील बदल हे देशासमोरील मोठे आव्हान आहे. कृषी आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. सौरऊर्जेचा अधिकाधिक वापर कृषी क्षेत्रासाठी केला जाणार आहे. कृषी प्रक्रिया उद्योगावर लक्ष्य केंद्रित केले जाणार आहे.

फलोत्पादन क्षेत्रात राज्य आघाडीवर आहे. अणुऊर्जा निर्मितीबरोबरच सौरऊर्जेचा वापर वाढविणार असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी या वेळी उपस्थित होते.

# दीड दिवसाच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपती बाप्पांचे बुधवारी घरोघरी आगमन झाले. यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. रायगड जिल्ह्यात एक लाखांहून अधिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आणि चैतन्य सोहळ्याला प्रारंभ झाला. दरम्यान दीड दिवसाच्या गणपतींचे गुरूवारी मोठ्या भक्तीभावाने वाजत-गाजत विसर्जन करण्यात झाले.



घरोघरी बुधवारी सकाळी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशांची शोडषोपचारे पूजाअर्चा करण्यात आली. दुपारी टाळ-मृदुंगाच्या गजरात आरती झाली. पुजा सांगण्यासाठी भटजींची धावपळ सुरू होती. गणेशोत्सवानिमित्त चाकरमानी मोठ्या संख्येने गावागावात दाखल झाले आहेत. त्यामुळे एरव्ही शांतता असलेल्या गावांना जाग आली आहे. बाप्पांच्या आगमनाने सर्वत्र उत्साह संचारला असून वातावरण भारून गेले आहे. रात्री नाचगाण्यांच्या कार्यक्रमात चाकरमानी आणि ग्रामस्थ दंग झाले होते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपामध्येही गजबज सुरू आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीकरिता कार्यकर्त्यांची लगबग सुरू आहे.

दीड दिवस गणेशांची मनोभावे पूजा केल्यानंतर गुरूवारी भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. वाजत-गाजत गुलाल उधळीत बाप्पांच्या मिरवणुका निघाल्या. या मिरवणुकांमध्ये भक्त धुंद होऊन नाचत होते. ग्रामीण भागात नदी, तलाव तसेच समुद्रात गणेशमूर्तींचे भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले.

### गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण

कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे मागील दोन वर्षे गणेशोत्सवाच्या उत्साहात खंड पडला होता. कोकणात धूमधडाक्यात साजरा होणारा हा उत्सव अतिशय साधेपणाने साजरा करावा लागला होता, मात्र यंदा कोरोनामुक्त वातावरणात गणेशोत्सव साजरा होत असल्याने गणेशभक्तांमध्ये उत्साह संचारला आहे. मुंबई, पुणे, सुरत या भागात नोकरी व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले चाकरमानी गावी येत असतात. यंदा या उत्सवासाठी येणाऱ्या चाकरमान्यांची संख्या दरवर्षीच्या तुलनेत अधिक असल्याचे दिसून येते.

# कुठलाही शेतकरी योजनेपासून वंचित राहू नये

## केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्र सिंग तोमर यांचे निर्देश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कृषी मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी घेतलेल्या बैठकीत गुरुवारी (दि. १) देशातील विविध राज्यांच्या कृषीमंत्र्यांना बोलावून त्यांचे मत जाणून घेण्यात आले. यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, हरियाणा, आंध्र प्रदेश, गुजरात, छत्तीसगढ, पंजाब, राजस्थान, आसाम, अरूणाचल प्रदेश आदी राज्यातील कृषीमंत्र्यांनी त्यांचे विचार बैठकीत मांडले.

शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकार अनेक योजना राबवित असते. त्यातीलच एक महत्त्वाची योजना म्हणजे पीएम किसान योजना. पीएम किसान योजनेंतर्गत दरवर्षी कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात सहा हजार रुपयांचा आर्थिक मदतनिधी जमा होतो. दरवर्षी पीएम किसान योजनेंतर्गत योजनापात्र शेतकऱ्यांच्या खात्यात दोन हजारांच्या तीन इन्स्टॉलमेंटमध्ये पैसे जमा होतात. या योजनेच्या माध्यमातून दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त धनराशी ११.३७ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात टाकण्यात आले आहेत.



केंद्रिय कृषी आणि किसान कल्याण मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी राज्यातील कृषीमंत्र्यांसोबत घेतलेल्या या बैठकीदरम्यान योजनेस पात्र असणारा कुठलाही शेतकरी योजनेपासून वंचित राहता कामा नये, असे आदेश देण्यात आले, तसेच देशभरातील सगळ्या शेतकऱ्यांचा डेटा लवकरात लवकर जमा करून अपडेट करण्यासही सांगितले आहे.

# दारूबंदी अधिकाऱ्याचा दारू पिऊन मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील दारूबंदी अधिकाऱ्याचा बुधवारी (दि. ३१) दारूचे अतिसेवन केल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालाजी शिवाजी माने हे दारूबंदी कार्यालय येथे निरीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांना नेहमी अति प्रमाणात दारू पिण्याची सवय होती. बुधवारी जास्त प्रमाणात दारू सेवन केल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दारूचे अतिसेवन केल्याने त्यांचा मृत्यू झाला असल्याचे आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले. महाड शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## निवडक

### काँग्रेस पक्षाला लागली गळती

**नवी दिल्ली** : काँग्रेसमधील बंडखोर जी-२३ गटाचे नेते गुलाम नबी आझाद यांनी माजी पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांच्यावर घणाघाती टीका करीत पक्षाचा राजीनामा दिला. जम्मू-कश्मीर काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष अनिरुद्ध रैना तसेच प्रदेश सरचिटणीस माणिक शर्मा यांनीही राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता पुन्हा गुलाम नबी आझाद यांच्या समर्थनार्थ भारतीय राष्ट्रीय छात्र संघाच्या ३६ विद्यार्थी नेत्यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे पक्षाला गळती लागल्याचे दिसून येत आहे.

### युनेस्को यादीत दुर्गापूजेचा समावेश

**कोलकाता** : पश्चिम बंगालचा सांस्कृतिक ठेवा दुर्गापूजेचा युनेस्कोने अमूर्त सांस्कृतिक वारसा प्रतिनिधी यादीत समावेश केला आहे. यासाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी युनेस्कोचे आभार मानले आहेत. दुर्गापूजेला आयसीएच टॅग दिल्यामुळे आता दुर्गापूजा उत्सव एक महिना आधीच सुरू होईल.

# दोन अपघातांत दोघे ठार, दोन जखमी

**खोपोली, महाड : प्रतिनिधी**

खोपोली-पेण रस्त्यावर रानसई गावाजवळ बुधवारी (दि. ३१) झालेल्या अपघात कंटेनरचालकाचा मृत्यू झाला, तर मुंबई-गोवा महामार्गावर महाड तालुक्यातील दासगाव गाव हद्दीत गुरुवारी (दि. १) पहाटे झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला असून दोन जण जखमी झाले.



खोपोली-पेण रस्त्यावर रानसई गावाजवळ वळण रस्त्यावर कंटेनर अनियंत्रित होऊन उलटला. कंटेनरमधील पाईप चालकाच्या केबिनमध्ये घुसल्याने चालक अडकून पडला होता. अपघाताची माहिती मिळताच खोपोली आपत्कालीन मदत ग्रुपचे सदस्य, पोलिसांनी अडकलेल्या चालकाला बाहेर काढले, मात्र त्याचा मृत्यू झाला.

दुसऱ्या अपघातात गुरुवारी सकाळी मुंबई-गोवा महामार्गावर दासगाव हद्दीत मुंबईहून गोवाकडे जाणारा कंटेनर (क्र. एमएल ०१ जी ५६३५) मुंबईकडे जाणाऱ्या आयशर टेम्पो (क्र. एमएच ०६ बीडी १३७८)वर विरुद्ध दिशेला येऊन आपटला. या धडकेत आयशर टेम्पोचालक अशोक बारगीर (रा. दासगाव) जागीच ठार झाला, तर टेम्पोमधील महफुज मजिदुल्ला खान (रा. नागलवाडी) आणि कंटेनरचालक दिनेश कुमार बीजनाथ यादव (रा. बिहार) हे दोघे जण गंभीर जखमी झाले.

# 'अनिल परबांचे रिसॉर्ट जमीनदोस्त करणार'

**भिवंडी : प्रतिनिधी**

ठाकरे सरकार काळातील भ्रष्टाचाराचे प्रतीक असलेल्या अनिल परब यांच्या दापोली येथील ट्विन रिसॉर्ट दिवाळीआधी जमीनदोस्त केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा भाजप नेते किरीट सोमय्या यांनी भिवंडीत दिला.

भाजपचे शहराध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या धामणकर नाका मित्र मंडळाने अयोध्या येथील राम मंदिराची प्रतिकृती उभारली असून या देखाव्याचे उद्घाटन किरीट सोमय्या व आरसी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, या वेळी सोमय्या बोलत होते. या वेळी शेट्टी यांनी सोमय्या यांच्या हाती गदा दिल्यानंतर गणेशाला अर्पण केलेली हिच गदा दापोलीच्या अनधिकृत रिसॉर्टवर आपटणार, अशी प्रतिज्ञा सोमय्यांनी केली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली राज ठाकरेंची भेट




**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १) राज ठाकरे शिवतीर्थ या निवासस्थानी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आम्ही एकमेकांकडे जात असतो. त्यामुळे मी दर्शनासाठी राज ठाकरेंकडे आलो आहे. त्यांचे ऑपरेशन झाले होते. त्यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी मी आलो होतो, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या भेटीमध्ये जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. बाळासाहेबांच्या सान्निध्यात त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सगळ्यांनी काम केले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.






## गणपती बाप्पा मोरया...

**पनवेल : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी बुधवारी गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटूंबीय उपस्थित होते. (छाया : लक्ष्मण ठाकूर)**

अधिक छायाचित्रे पान ८ वर...





# कंत्राटी सरकारला बाप्पाने खाली खेचले

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा 'मविआ'वर घणाघात

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेमध्ये बंडखोरी झाल्यानंतर शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आणि युवा नेते आदित्य ठाकरे हे राज्यभरात निष्ठा यात्रा करीत आहेत, पण राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या मदतीने टीव टीव करीत महाराष्ट्रभर फिरत आहे. शिंदे आणि फडणवीस सरकार हे पर्मनंट सरकार आहे. आधीचे कंत्राटी सरकारला गणपती बाप्पाने खाली खेचले आहे, अशा शब्दांत भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी 'मविआ'वर टीका केली आहे.

शिवसेनेचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे हे राज्यभरात दौरे करीत आहे. शिवसैनिकांना जाऊन भेटून संवाद साधत आहे. आदित्य ठाकरे यांच्या या दौऱ्यावरून नारायण राणे यांनी आपल्या शैलीत टीका केली आहे,



तसेच नारायण राणे यांनी शिवसेनेच्या दसरा मेळाव्याबाबत शिंदे गटाची बाजू घेतली आहे. राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या मदतीने टीव टीव करीत महाराष्ट्रभर फिरत आहे, अशा शब्दांत नारायण राणे यांनी आदित्य ठाकरेंवर टीका केली, तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतःच्या कर्तृत्वावर राज्याचे मुख्यमंत्री झाले आहे. दसरा मेळावा जर झाला तर तो एकनाथ शिंदे घेतील. जर एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्याला बोलावलं तर मी नक्की येईल, असे नारायण राणे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी गेल्या अडीच वर्षांत फक्त तीन तास मंत्रालयामध्ये काम केले. बाळासाहेबांच्या नावाने उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपद मिळाले होते, मात्र आता तुम्ही निवृत्त झाला आहात, त्यामुळे तुम्हाला आता बोलण्याचा अधिकार नाही, टीका करण्याचा अधिकार नाही, अशी टीकाही राणेंनी केली.

# दीड दिवसाच्या गणरायांचे विसर्जन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत, नेरळ व माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक व खासगी अशा सुमारे नऊ हजारांपेक्षा जास्त श्री गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यापैकी २,१८१ दीड दिवसाच्या गणरायांचे विसर्जन गुरुवारी (दि. १) करण्यात आले.



यामध्ये केवळ दोन गणपती सार्वजनिक होते. गेल्या वर्षी कोरोनाच्या संकटामुळे विसर्जन करतानाही निर्बंध होते, मात्र यंदा पुढच्या वर्षी लवकर याच्या गजरात विसर्जन करण्यात आले.

दुपारी चार वाजल्यापासून विसर्जनाची सुरुवात झाली. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२३७ खासगी, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८१२ खासगी, सहा सार्वजनिक आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२४ खासगी व दोन सार्वजनिक असे खासगी २१७३ आणि सार्वजनिक आठ अशा एकूण २१८१ दिड दिवसांच्या गणरायांचे पुढच्या वर्षी लवकर या अशा गजरात साश्रू नयनांनी विसर्जन करण्यात आले. अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात बुधवारी मोठ्या उत्साही वातावरणात गणरायाचे आगमन झाले होते. गुरुवारी (दि. १) दुपारपासूनच दिड दिवसांच्या गणरायाला पुढच्या वर्षी लवकर ये अशी साद देत भावपूर्ण जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.



गणेशभक्त डोक्यावर, हातगाडी, रिक्षा, चारचाकी वाहनांतून कुंडलिका नदीच्या पात्रात गणपती विसर्जनासाठी आणत होते. शहरात बंदर पकटी, नदी संवर्धन, दमखाडी व अष्टमी येथे विसर्जन करण्यात आले. रोहा पोलीस स्टेशन हद्दीत दिड दिवसाचे ६९८ तर कोलाड पोलीस ठाणे अंतर्गत ७९१ दीड दिवसाचे गणपती बसविण्यात आले होते. शहरात मुख्याधिकारी धिरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटावर नगर परिषद कर्मचारी, पोलीस तैनात होते. नगर परिषद व रोटरी क्लबच्या वतीने निर्माल्य गोळा करण्यात आले.

**माणगाव : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याच्या गजरात माणगावात दीड दिवसाच्या गणपतींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले.

या वेळी माणगाव नगरपंचायतीतर्फे स्वागत करण्यात आले. नगरपंचायतीतर्फे विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती.



# पेणमध्ये विसर्जनासाठी कृत्रिम तलाव; पोलिसांचा बंदोबस्त

**पेण : प्रतिनिधी**

ढोलताशांच्या गजरात वाजत-गाजत भाविकांच्या घरी गणरायांचे आगमन झाले. त्यानंतर गुरुवारी दीड दिवसांच्या गणपती बाप्पांना भक्तांनी निरोप दिला. पेणमध्ये विविध ठिकाणी नगर परिषदेतर्फे विसर्जनासाठी कृत्रिम तलाव तयार करण्यात आले होते. विसर्जनासाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणुकीदरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थेतही बदल करण्यात आले होते.



दुपारनंतर सर्वत्र दीड दिवसाच्या गणरायाचे विसर्जन करण्यास सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून शांत झालेल्या पावसाने बुधवारी सायंकाळी हजेरी लावली, मात्र विसर्जनाच्या दिवशी विश्रांती घेतली. पेणमधील भोगावती नदी, कासार तलाव, तसेच ग्रामीण भागात तलावात गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली कासार तलाव येथे पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे, भोगावती नदीवर तसेच ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पेपर कपपासून तयार केला गणपती

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्राहकांसाठी नावीन्यपूर्ण योजना जाहीर करण्यापासून सामाजिक जाणीवा जपणारे विविध उपक्रम राबवणाऱ्या नेक्सस सीवूड मॉलने गणेशोत्सवातही एक आगळावेगळा उपक्रम राबवला आहे. मॉलला भेट देणाऱ्यांना इको-फ्रेंडली म्हणजेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचं महत्त्व पटवून देण्यासाठी या मॉलमध्ये पेपरच्या कपपासून गणपतीचे रूप साकारण्यात आले आहे. पाणी पिण्यासाठी वापरलेले कप फेकून देण्याऐवजी त्यांचा हा अशा पद्धतीने उपयोग करून नेक्सस मॉलने एक वेगळाच संदेश दिला आहे.



नेक्सस सीवूड मॉलने एक आगळीवेगळी कल्पना राबवली. या मॉलमध्ये ग्राहकांनी वापरलेल्या कागदांच्या कपपासून १७ फुटांचा भव्य गणपती बाप्पा साकारण्यात आला. त्यासाठी ७८२१ कप गोळा करून ते वापरण्यात आले. प्रसिद्ध कलाकार आबासाहेब शेवाळे यांनी ही मूर्ती साकारली. आबासाहेब शेवाळेंनी याआधीही गणपती बाप्पाच्या अशा मोठ्या मूर्ती बनवल्या आहेत.

या उपक्रमाद्वारे नेक्सस सीवूड मॉलला आपल्या ग्राहकांना पर्यावरणाची जपणूक करण्याचा संदेश द्यायचा आहे. एकदाच वापर होईल, अशा प्लॅस्टिकचा वापर टाळा आणि अधिक पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करा, असे ठसवण्याचा हा प्रयत्न आहे. हा संदेश देणारी ही गणेशाची प्रतिकृती ग्राहकांना ९ सप्टेंबरपर्यंत पाहता येणार आहे.

# खून करणाऱ्या आरोपीस १२ तासांच्या आत अटक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी (दि. ३१) नागशेट येथील जंगल भागात एका महिलेचा मृतदेह अर्धवट जाळलेल्या स्थितीत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच, पोलीस निरीक्षक नितीन गवारे यांनी घटनास्थळी पोहचून तातडीने तपासाला सुरुवात केली. १२ तासांतच आरोपीला अटक करण्यात यश आले आहे.

मांडवा पोलीस ठाण्यात २१ ऑगस्ट रोजी एक महिला हरवलेली असल्याची माहिती मिळाली. सापडलेला मृतदेह हा याच बेपत्ता महिलेचा असल्याची पोलिसांनी खात्री करून मुरूड पोलिसांनी त्वरीत सर्व माहिती घेऊन संशयित आरोपी सचिन थळे वय २४ याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, आरोपीने पोलीस गुन्हा कबूल केला आहे. मृत महिलेचे नाव पूनम पाटील असून तिचे सचिन थळे यांच्या प्रेमसंबंध होते. काही कारणावरून या दोघांमध्ये भांडण झाल्याचा राग आरोपीने मनात धरून या महिलेस ठार मारले. पुरावा नष्ट करण्यासाठी जंगल भागात मयत महिलेच्या अंगावर लाकडे रचून प्रेत जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000024451** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-42/2022-2023.** RFx e-tender for Supply of Portable Heavy Duty Hydraulic Crimping Machine at EHV Substation Maint. Sub-division Apta under EHV O&M Division Panvel. **Tender amount Rs. 2,45,635/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **01.09.2022, 17:00 Hrs. to 08.09.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 08.09.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **09.09.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV (O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Tender Notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| **Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/ Ten-8/22-23 (RFX No. 7000024415)** | | | **Period for submission of E-Bid: 01.09.2022 to 08.09.2022 up to 23:59 hrs** | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work : Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus conductor Span at 400kV RS, Kharghar** | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs)** | **Tender Fee (Rs)** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| Rs.12,28,879.44 (Including GST) | Rs. 12,288.79 | Rs.500/- + GST | **08.09.2022** up to 23:59 hrs | **09.09.2022** at 15:00 hrs (If possible) | **09.09.2022** at 15:15 hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.O.Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972
2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their Bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**


# गणेशमंडळांनी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

राज्य शासनाने सार्वजनिक गणेश मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहे. इच्छुक गणेशोत्सव मंडळांनी शुक्रवारी (दि. २) पूर्वी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

गणेशोत्सव मंडळाने करावयाच्या अर्जाचा नमुना राज्य शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in, www.pldeshpandekalaacademy.org व https://mahaganetteers.com वर उपलब्ध आहे. सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळाने अर्ज भरुन mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर दि. २ सप्टेंबरपूर्वी ऑनलाईन पाठवावेत. त्या अनुषंगाने उपविभागीय स्तरावर निवड समिती गणेशोत्सव उत्सव स्थळी प्रत्यक्ष भेट देतील. ही समिती प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत गुणांकन करेल आणि त्यातील एका उत्कृष्ठ गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांच्या संबंधित कागदपत्रे, व्हिडीओ व गुणांकन जिल्हास्तरीय समितीकडे दि. ८ सप्टेंबरपर्यंत सादर करतील व जिल्हास्तरीय समिती राज्य समितीकडे दि. १३ सप्टेंबरपर्यंत सादर करतील.

# माणगावातील शिक्षक कॉलनीत घरफोडी

## सोन्याचे मंगळसूत्र घेऊन अज्ञात चोरटा फरार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव दत्तनगर भागातील एका बंद घराचा कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने सोमवारी (दि. २९) सायंकाळी घरातील ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून पोबारा केला.

विश्वनाथ हुल्लनाईक तालिमकर (वय ५२, रा. शिक्षक कॉलनी, दत्तनगर) यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा सोमवारी सायंकाळी ४ ते ५ वाजण्याच्या सुमारास तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला आणि बेडरूममधील कपाटात ठेवलेले ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र घेऊन फरार झाला. या प्रकरणी अज्ञात चोरट्यावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलादपूर चोळई येथे चोरी

## *दुचाकी, मोबाइलसह रोख रक्कम लंपास*

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील चोळई येथे सोमवारी (दि. २९) पहाटेच्या सुमारास एका घराबाहेरील दुचाकी, घरातील मोबाइल व रोख रक्कम तसेच बँकेचे पासबूक, आधार कार्ड आदी कागदपत्रांची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील बांधकाम व्यवसायीक रोहिदास सदाशिव मोहिते यांच्या घरासमोरील हिरो होण्डा पॅशन प्रो मोटारसायकल, चार हजार रूपये, महाड अर्बन बँकेचे पासबुक, आधारकार्ड आदी कागदपत्रे आणि एमआय कंपनीचा आठ हजार रूपये किंमतीचा मोबाइल फोन असा ऐवज अज्ञात व्यक्तीने घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा उचकटून चोरून नेला. या चोरीप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस नाईक प्रशांत नटे अधिक तपास करीत आहेत.

# कडावचा बालदिगंबर गणेशभक्तांचे श्रद्धास्थान

**कर्जत : बातमीदार**

अष्टविनायकानंतर कर्जत तालुक्यातील कडाव येथील बालदिगंबर गणेश मंदिराची ख्याती आहे. या मंदिरातील श्री गणेशाची मूर्ती अतिशय लोभस आणि प्रसन्न असल्याने या मंदिरात भक्तांची कायमच गर्दी असते.

कर्जत-मुरबाड मार्गावरील कडाव येथे असलेल्या या बालदिगंबर गणेशाची आणि मंदिराची ख्याती सर्वत्र आहे. हे गणेश मंदिर मध्ययुगीन शतकातले आहे. गणेशभक्त श्रीमान योगी कण्व ऋषी दक्षिण भारताची यात्रा करत असताना कडाव येथे आले. ते तेथे काही दिवस मुक्कामी असताना आपल्या गणेश उपासनेमध्ये खंड पडू नये म्हणून त्यांनी बालदिगंबर गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना केली अशी दंतकथा आहे.

सुमारे ३५० वर्षांपूर्वी पार्वतीबाई पेशवे यांनी कर्जत तालुक्यातील कडाव येथील बालदिगंबर मंदिराला मदत केल्याचा उल्लेख पेशवीकालीन दफ्तरी आहे. पूर्वी ही गणेशाची मूर्ती साधारण सहा फूट उंचीची होती. १९५२ साली मुर्तीचे कवच येथे पडले, तेव्हा तेथे श्री बालगणेश स्वरूपात सिद्धीविनायकाची मूर्ती दिसली. ही मूर्ती पश्चिमाभिमूख असून डोक्यावर मुकूट, गळ्यात हार, दोन हातात शस्त्र, एक हात सोंडे खाली व एका हाताने आशीर्वाद देत आहे. १९७८ साली या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असताना काही दगडी शिल्प व अवशेष सापडले. पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष तात्या खरे यांनी शिल्प व अवशेष यांची पाहणी करून ते सातव्या किंवा आठव्या शतकातले असल्याचे सांगितले. १९७८ ते १९९१पर्यंत या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले.








### दुखवटा

**रत्नमा राजन्न शिंदे**

**पाली : प्रतिनिधी**



शिहू येथील प्रसिद्ध डॉ. विनोदकुमार शिंदे यांच्या मातोश्री रत्नमा राजन्न शिंदे यांचे वयाच्या ८४व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, सुना व नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे. रत्नमा शिंदे या स्वभावाने अत्यंत प्रेमळ व मनमिळावू स्वभावाच्या होत्या. अडीअडचणीत व संकटात सापडलेल्या व्यक्तीला वेळीच मदतीचा हात देण्यात त्यांचा हातखंडा होता. आपल्या मुलांवर सुसंस्कार रुजवून सामाजिक बांधिलकी व सेवाभावी दृष्टीने समाजासाठी वाहून घेण्याची शिकवण त्यांनी दिली.






पनवेल भाजपतर्फे
**जनहितार्थ**
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. काळभैरव कार्यालय, कळंबोली ■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ उपकेंद्र, नावडे

**ग्रामिण लसीकरण**

■ टेंभोडे ■ भोईरपाडा/पेठाली ■ देवीचापाडा ■ फणसवाडी/चाफेवाडी
■ खांदा गाव ■ तळोजे मजकूर/फरशीपाडा

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# पनवेलमध्ये नियोजनबध्दरित्या बाप्पांचे विसर्जन

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**


पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कोमोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सायंकाळी ५ वाजेपर्यंत २००हून अधिक दीड दिवसाच्या घरगुती गणपतींचे भावपूर्ण वातावरणात नियोजनबध्दरित्या विसर्जन करण्यात आले.

गणेशभक्तांच्या सोयी सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग या ७ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रात एकुण ६१ ठिकाणी गणेश विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये खारघरमध्ये ३७ ठिकाणी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४७ गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. कळंबोली



प्रभागामध्ये नऊ ठिकाणी सायंकाळी ५ वाजेपर्यंत येथे ६६ गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. कामोठे प्रभागामध्ये सहा ठिकाणी सायंकाळी ५ वाजेपर्यंत २६ गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. पनवेल प्रभागामध्ये नऊ ठिकाणी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६१ गणेशमुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते.

चारही प्रभागांमध्ये कृत्रिम तलाव, विद्युत व्यवस्था, मंडप, बॅरिगेटिंग, गणेश मूर्तींची नोंदणी, लाऊड स्पीकर, लाईफ जॅकेट, तराफा निर्माल्य कलशाची सोय करण्यात आली आहे. विसर्जन घाटांवर महापालिकेच्यावतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभाग तसेच पोलीस विभागाच्यावतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता. विसर्जनावेळी गर्दी होऊ नये यासाठी महापालिकेने नागरिकांसाठी ऑनलाइन टाईम स्लॉट बुकिंग प्रणाली विकसित करून दिली होती. याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



उरण : येथे दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन नगर परिषदेच्या विमला तलाव येथे करण्यात आले. या वेळी मुख्याधिकारी संतोष माळी व कर्मचारी उपस्थित होते. देऊळवाडी युवक मंडळ व ग्रामस्थांनी सहकार्य केले.



पनवेल : गणेशोत्सवानिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी प्रसिद्ध केलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, अभिषेक भोपी, अमोघ ठाकूर, सुमित झुंजारराव आदी उपस्थित होते.



खारघर : बेलपाडा येथे विसर्जन तलावात दीड दिवसाच्या गणरायाचे विसर्जन करण्यात आले. या आधी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी विसर्जन तलावाची पाहणी केली.

## खचलेल्या रस्त्याचे काम पूर्ण

### राजू सोनी यांची तत्परता




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी तत्परतेने खचलेल्या रस्त्याचे काम स्वःखर्चाने पूर्ण करून दिल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

शहरातील कोळीवाडा येथील काही भागाचा रस्ता खचलेला होता. या संदर्भात तेथील रहिवाशांनी पनवेल महानगरपालिकेशी संपर्क साधून तक्रार सुद्धा केली होती. गणेशोत्सवाच्या काळात येथून ये-जा करताना नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले असते. ही बाब स्थानिकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ मा.नगरसेवक राजू सोनी यांच्याशी संपर्क साधला व सदर रस्त्याचे काम पूर्ण करून देण्याची मागणी केली.

राजू सोनी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून व गणपती बाप्पांचे आगमन व विसर्जन सुखरुप व्हावे या दृष्टीने त्वरित स्वःखर्चाने त्या परिसरातील रस्ता तात्काळ सुस्थितीत बनवून दिला. याबद्दल तेथील रहिवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## देऊळवाडीतील मैदान झाले चकाचक

**उरण : बातमीदार**

उरण शहरातील देऊळवाडी येथील शंकर मंदिरासमोर (सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या समोर) मोकळ्या मैदानातील कचरा साफसफाई करून त्या जागी रेती, ग्रीट, खडे टाकून मैदान स्वच्छ व सुंदर बनविण्यात आले आहे.

गणपती उत्सवासाठी हे मैदान बनविले असून या कामी भाजप नगरसेवक राजू ठाकूर यांनी पुढाकार घेतला. यासोबतच सामाजिक कार्यकर्ते रोहित नितीन पाटील, देऊळवाडी युवक मंडळ अध्यक्ष निरंजन अशोक नार्वेकर, उपाध्यक्ष प्रसाद म्हात्रे, तसेच देऊळवाडी युवक मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच देऊळवाडी ग्रामस्थ मंडळाचे पदाधिकारींनीही अथक परिश्रम घेतले व देऊळवाडी परिसर स्वच्छ व सुंदर केला. सणासुदीच्या काळात परिसर साफ करण्यात आल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.























पनवेल : लाडक्या बाप्पाचे उत्साहात आगमण झाले आहे. त्यानिमित्त भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी गुरुवारी तालुक्यातील चिंध्रण, शिरवली, पाले खुर्द, तळोजा, खुटूकबंधन या ठिकाणी विराजमान झालेल्या घरगुती गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप नेते एकनाथ देशेकर, सरपंच कमलाताई देशेकर, राम पाटील, निर्दोश केणी, नावडे सरचिटणीस गौरव भोईर, सागर भोईर, सुहासिनी केकाणे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळंबोलीत मंगळागौर कार्यक्रम उत्साहात

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली सेक्टर १० इ रोडपाली येथील वेरोना सोसायटीत गणेशोत्सवाचे यंदाचे पाचवे वर्ष आहे. मागील दोन वर्षे कोरोना काळात गणेशोत्सव जल्लोषात साजरा करता आला नाही. यावर्षी मात्र सोसायटीच्या महिलांनी विविध कार्यक्रम राबवण्याचे ठरवुन उत्सवात जोश निर्माण केला आहे. त्याचाच एक भाग म्हणुन सोसायटीच्या महिलांनी मंगळागौर व विविध पारंपरिक नृत्यांचे आयोजन केले होते.

मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन प्रथमच कळंबोलीमध्ये वेरोना सोसायटीत करण्यात आले, तसेच बाल कलाकारांच्या विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. जल्लोषात या वर्षीचा गणेशोत्सव साजरा करत असल्याचे सोसायटीतील महिलांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख म्हणून स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या अध्यक्ष विजया कदम यांनी उपस्थिती लावली, असे वेरणा सोसायटीचे सेक्रेटरी रोहन गायकवाड यांनी सांगितले.


बक्षीस वितरणही विजया कदम यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन दीपक गोंधळी यांनी केले. हा कार्यक्रम सोसायटी कमिटीच्या सदस्यांच्या तसेच सोसायटीच्या महिलांच्या यांच्या सहकार्याने झाला व त्यातील महिलांपैकी विभा गायकवाड व आर्या कदम यांनी मंगळागौरबद्दल त्यांचे मनोगत व्यक्त केले.



## झोपेत चालताना एकाचा मृत्यू

**पनवेल :** बांधकाम चालू असलेल्या इमारतीवरून झोपेत चालत जाऊन एक व्यक्ती खाली पडून दगावल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. त्याच्या नातेवाइकांचा शोध शहर पोलीस करीत आहे.

मयत व्यक्तीचे नाव राजू चक्रवर्ती (अंदाजे वय ४५ वर्षे), असे असून डोक्यावरील केस मध्यम काळे, नाक सरळ, दाढी मिशी काळ्या रंगाची बारीक, चेहरा उभट, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फूट असून अंगात करड्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक दयानंद महाडेश्वर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



रामप्रहर | गणेशोत्सव

सुखकर्ता, दु:खहर्ता गणरायाचे लवकरच आगमन होणार आहे. आपल्या घरगुती व सार्वजनिक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून झाल्यावर त्याचा फोटो काढून दै. रामप्रहरला पाठवा आणि आनंद द्विगुणित करा.

बाप्पाचा फोटो 'रामप्रहर'च्या प्रतिनिधींकडे किंवा थेट ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर स्वत:च्या नाव व पत्त्यासह पाठवा. त्यास यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. विशेष म्हणजे त्याकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. हा उपक्रम १० दिवस विनामूल्य असणार आहे.

यंदाचा गणेशोत्सव 'रामप्रहर'सोबत साजरा करा!

अधिक माहितीसाठी ०२२-२७४८०१०० या क्रमांकावर संपर्क साधावा.


## संपादकीय

# राजकीय प्रदूषण दूर

मुंबईकरांच्या अडचणींचा भार काहीसा हलका करण्यासाठी तेव्हाच्या देवेंद्र फडणवीस सरकारने वेगवान विकासाचा मार्ग पत्करून मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने हाती घेतली होती. हजारो कोटींच्या या प्रकल्पाचे जवळपास निम्मेअधिक काम पूर्णत्वाला गेले असताना राजकीय हेतूने पर्यावरणाचा मुद्दा उकरून काढून या प्रकल्पाच्या कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न आघाडी सरकारच्या काळात झाला, मात्र हे राजकीय प्रदूषण आता दूर झाले असून शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात मेट्रो प्रकल्प वेग घेईल, असे दिसू लागले आहे.

**सध्या पर्यावरणाचे अनेक ठेकेदार निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. पर्यावरणाचे रक्षण हे मानवाच्या अस्तित्वाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही, परंतु पर्यावरण रक्षणाच्या नावाखाली अन्य हेतू साध्य करण्याचा प्रयत्न सर्रास होताना दिसतो हेही तितकेच खरे आहे, तसेच ही समस्या काही फक्त भारतालाच भेडसावत नसून अवघ्या जगासमोरच हे आव्हान आहे. दीड कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या मुंबईतील चाकरमानी दैनंदिन प्रवासासाठी उपनगरीय रेल्वे आणि बेस्ट बस अशा सरकारी व निमसरकारी व्यवस्थांवर प्रामुख्याने अवलंबून असतात. त्यांचा हा दैनंदिन प्रवास काही प्रमाणात सुसह्य करण्यासाठी मेट्रो प्रकल्पाचे जाळे शहरभरात निर्माण करण्याची योजना आखण्यात आली, परंतु या प्रकल्पांतर्गतच्या आरे येथील कारशेडसाठी काही झाडे तोडण्यावरून रान उठवण्यात आले. वास्तवत: कारशेडसाठी आरेतील जो भूखंड निश्चित करण्यात आला होता त्यातील काही मोजकीच झाडे तोडण्यात आली. जे घडले त्याला सरसकट तोडही म्हणता येणार नाही. यातील अनेक झाडे अन्यत्र पुनर्रोपित करण्याची योजना निश्चित होती. तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या कैकपट अधिक झाडे लावण्याचा निर्धारही मेट्रो प्रकल्पाच्या प्रशासनाने आधीच जाहीर केला होता. या साऱ्या प्रयासांमधून पर्यावरणाचे झालेले अल्पसे नुकसानही निश्चितपणे भरून निघाले असते, परंतु विशिष्ट सामाजिक वर्गातील पर्यावरणवाद्यांवर छाप पाडण्यासाठी काही उत्साही राजकारणी पुढे सरसावले. पर्यावरणाच्या बाजूने ओरड करीत प्रसिद्धी माध्यमांसमोर चमकणे आणि पर्यावरणवादी म्हणून मिरवणे हाच हेतू त्यांच्या खटाटोपामागे अधिक होता, हे काही लपून राहिलेले नाही. या आत्मकेंद्रीत नेत्यांमुळे प्रकल्पाचे आणि पर्यायाने मुंबईकरांचे किती मोठे नुकसान झाले, याची जाणीव जनतेला अवश्य होती. मेट्रो प्रकल्प हे काही आंधळ्या विकासाचे उदाहरण नाही. पर्यावरणाची बारकाईने काळजी घेऊनच असे मोठे प्रकल्प हाती घेता येतात. पर्यावरण विषयक जागतिक निर्बंध इतके कठोर आहेत की, अशी काळजी घेतली नाही तर या प्रकल्पांना निधीच उपलब्ध होणार नाही, परंतु स्वार्थी राजकारणासाठी हे सारे वास्तव नजरेआड करून पर्यावरणाच्या नावाने ओरड करण्यात आली, परंतु आता शिंदे-फडणवीस सरकारने राज्याचा कार्यभार हाती घेतल्याने मेट्रो प्रकल्प कोणीही रोखू शकणार नाही. मेट्रो ३च्या मार्गिकेतील पहिल्या मेट्रो गाडीच्या चाचणीला मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा झेंडा दाखवला. आता आरे कारशेडचे कामही सुरू झाले असून मेट्रो प्रकल्पाच्या या मार्गिकेचे काम २०२३च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल असे दिसू लागले आहे.**

# ऐतिहासिक कोर्लई किल्ला दुर्लक्षित





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा हा ऐतिहासिक वारसा असलेला किल्ला आहे. या जिल्ह्यात भरपूर गडकिल्ले आहेत. रायगड, कुलाबा, जंजिरा, खांदेरी, उंदेरी, सुधागड हेच किल्ले लोकांना माहित आहेत. अनेक किल्ले असे आहेत जे लोकांना फारसे माहित नाहीत. त्यामुळे ते दुलक्षित आहेत. त्यापैकी एक आहे मुरूड तालुक्यातील कोर्लई किल्ला. कुंडलिका नदी सिंधुसागराला जिथे मिळते, त्या संगमावर कोर्लई गावतील टेकडीवर हा कोर्लई किल्ला आहे. तीन बाजूंनी पाणी आणि एका बाजूने जमीन आहे. यातील उत्तर दिशेने कुंडलिका खाडी, तर दक्षिण आणि पश्चिम दिशेला समुद्राचा वेढा आहे. ऊन, पाऊस झेलत ताठ मानेने उभा आहे. पर्यटकांना या किल्ल्याचे आकर्षण आहे. येथे दीपस्तंभ आहे. किल्ला व दीपस्तंभ पाहण्यासाठी अनेक पर्यटक या किल्ल्यात येत असतता, परंतु काही सुविधा नसल्यामुळे पर्यटक यथे थांबत नाहीत. हा किल्ला पर्यटनस्थळ म्हणून विकसित केल्यास तेथे वर्दळ वाढेल व किल्ला सुरक्षित राहिल.

अलिबागहून मुरूडकडे जाताना साळावचा पूल ओलांडल्यानंतर उजव्या हाताला दिसणार्या टेकडीवर जो किल्ला दिसता तोच हा कोर्लई किल्ला. पोर्तुगिजांनी आपले राज्य सुरक्षित करण्यासाठी कोर्लईच्या टेकडीवर गड बांधण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी इसवी सन १५२९मध्ये त्यांचे गव्हर्नर दि योगु लोपीश दि सिकैर याने तशी अहमदनगरच्या निजामशहाकडे परवानगी मागितली. यानुसार त्यांनी इथे ही माची, त्यावर त्यांच्या क्रुसाची बातेरी ऊर्फ सांताक्रुझची उभारणी केली, पण पोर्तुगिज आणि निजामशाहीचे बिनसले आणि किल्ल्याचे काम अर्धवट राहिले. पुढे पोर्तुगिजांचा वाढता धोका ओळखून निजामशहानेच १५९२मध्ये इथे हा जलदुर्ग उभारला. १३ सप्टेंबर १५९४ रोजी या दुर्गावरूनच पोर्तुगिज आणि निजामशाहीत संघर्ष उडाला. यामध्ये निजामशाहीचा पराभव झाला आणि गडाचा ताबा पोर्तुगिजांकडे आला. या दुर्गाच्या स्थापत्यावरही पोर्तुगिजांचा प्रभाव आहे. ऑगस्ट १६८३मध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी एकदा हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला होता, पण तो अयशस्वी ठरला. पुढे मार्च १७३९मध्ये चिमाजी अप्पांनी तळगडाचा हवालदार सुभानजी माणकर यांच्या मदतीने कोर्लई मिळवला आणि मराठ्यांच्या ताब्यात हा किल्ला आला. यानंतर इंग्रजांबरोबरच्या शेवटच्या युद्धापर्यंत हा गड मराठ्यांकडेच होता.

कोर्लईची तळातील माची चार खणखणीत बुरूज बांधून बंदिस्त केलेली आहे. इथेच गडावर येण्यासाठी दोन दरवाजेही आहेत. सैनिकांच्या खोल्या, दारूगोळ्याचे कोठार, तटावरील चार तोफा इथे दिसतात. पुढे प्रत्येक टप्प्याला विभागणारी एक अंतर्गत भिंत आणि दरवाजा आहे. यातील काही दरवाजांवर पोर्तुगिज भाषेतील शिलालेखही आहेत. या लेखांशिवाय, वेगवेगळ्या आकारांतील तोफा, पाण्याचे हौद, टाक्या, कोठारे, चर्च, महादेवाचे मंदिर आहे.

अलिबागहून मुरूडकडे जाताना साळावचा पूल ओलांडल्यानंतर काही मिनिटांतच कोर्लई गाव लागते. कोर्लई गावातून गडाला वेढा घालत एक रस्ता दक्षिणेकडे समुद्रकाठावर कोर्लई दीपस्तंभाकडे येतो. या किल्ल्यावर दीपस्तंभ आहे. हा दीपस्तंभ आणि त्याचे कार्य शुल्क भरून पाहता येते. या दीपस्तंभाकडून एक पायरीमार्ग गडावर चढतो. याशिवाय गडावर जाण्यासाठी आणखीही तीन प्रवेशमार्ग आहेत, पैकी दोन तळातील माचीकडून तर एक उत्तरेकडील कोर्लई गावातून थेट बालेकिल्ल्यात येतो. दीपस्तंभाकडून आलेल्या वाटेने १५-२० मिनिटांत आपण गडाच्या मधल्या भागात पोहचतो.

हा गड छोटा असून गडवर सहज जाता येते. तीन बाजूंनी असलेला अथांग समुद्र. समोर दिसणारा रेवदंडा किल्ला. तेथील नारळी-फोफळी असे नयनरम्य दृष्य पहाता येते. या किल्ल्याची माहिती देणारे फलक नाहित. या किल्ल्याची माहिती पर्यटकांना नाही, परंतु गडाच्या पयथ्याशी वाहन जाण्याकरीता पक्का रस्ता नाही. पर्यटकांसाठी आवश्यक असलेलया सुविधा नाहित. त्यामुळे पर्यटक येथे येत नाहीत. तसा हा किल्ला दर्लक्षितच राहिला आहे. कोर्लई किल्ला आहे. तेथे दीपस्तंभ आहे. तेथेचे चौपाटी आहे. या परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करून पर्यटकांना आवश्यक असलेल्या सुविधा दिल्यास अलिबागमधील कुलाबा, मुरूड येथील जंजिरा किल्ला तसेच रेवदंडा येथील किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने येणारा पर्यटक या किल्ल्यावर येऊ शकतात, येथे काही काळा थांबू शकतात. त्यामुळे या भागात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊ शकते. शासनाने येथे चांगल्या सुविधा उपलबध्द करून द्यायला हव्यात.



## बदलते तंत्रज्ञान



### ट्विटरचे नवीन 'ट्विटर सर्कल' अप्रतिम फीचर

जर तुम्ही ट्विटरवर खूप सक्रिय असाल, परंतु तुम्हाला काही ट्विट सर्वांना दाखवण्याऐवजी तुमच्या काही मित्रांना किंवा कुटुंबियांना दाखवायचे आहेत, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. ट्विटरने तुमची समस्या सोडवली आहे. कंपनीने 'ट्विटर सर्कल' नावाने आपले फीचर लॉन्च केले आहे. या फीचर अंतर्गत यूजर्स आता प्रायव्हेट ट्विट करू शकणार आहेत. म्हणजेच त्याखाली केलेले ट्विट फक्त तुमच्या सर्कलमधील लोकांनाच दिसेल. हे संपूर्ण वैशिष्ट्य काय आहे आणि ते कसे कार्य करेल याबद्दल जाणून घेऊया...

**१५० लोकांना सहभागी करू शकतात**

ट्विटरने ट्विट करून हे फीचर लाँच करण्याबाबत माहिती दिली. कंपनीने त्याच्या फीचरबद्दल देखील सांगितले आहे. रिपोर्टनुसार, सध्या ट्विटर सर्कलमध्ये केवळ १५० लोकांनाच समाविष्ट केले जाऊ शकते. हे फीचर इंस्टाग्रामच्या 'क्लोज फ्रेंड्स' फीचरसारखे आहे. १५० लोकांच्या सर्कलमध्ये कोण असेल हे ठरवण्याचा सर्व अधिकार तुम्हाला असेल, तसेच जेव्हा कोणी तुम्हाला ट्विटर सर्कलमधून जोडेल किंवा काढून टाकेल, तेव्हा तुम्हाला याबद्दलची सूचना मिळणार नाही.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, यूजर्सना सर्कलमधून बाहेर पडण्याची परवानगीदेखील दिली जाणार नाही. जर वापरकर्त्यांना सर्कलचा भाग व्हायचे नसेल, तर ते सर्कल तयार करणाऱ्या व्यक्तीला ब्लॉक करू शकतात. असे केल्याने तो सर्कलमधून बाहेर जाईल. या फीचरचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्कलात केलेले ट्विट हिरव्या बॅजच्या आत दिसतील. हे ट्विट कोणीही रिट्विट किंवा शेअर करू शकणार नाही. या ट्विटवर दिलेले सर्व प्रत्युत्तरे खासगी राहतील. कंपनी मे महिन्यापासून या फीचरची चाचणी करीत होती. आता ते जागतिक स्तरावर सुरू करण्यात आले आहे. गोपनियतेच्या दृष्टिकोनातून हे फिचर महत्त्वाचे मानले जात आहे.

# जागतिक नारळ दिनाचे वैशिष्ट्य



**निमित्त**

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. खाद्यपदार्थांपासून औषधांपर्यंत, पूजाविधीपासून सौंदर्य प्रसाधनांपर्यंत आणि असे अगणित उपयोग असलेल्या नारळाचा आज दिवस. केवळ खाद्य व अखाद्य उपयोगांव्यतिरिक्त मानवी आयुष्यात महत्त्वाचे स्थान असलेल्या या फळाविषयी जाणून घेऊ या काही विशेष बाबी...

नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशीरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तीशाली, रक्ताविरोधी, जंतुनाशक, जंतुनाशक आणि वात-पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते. हे सौंदर्यप्रसाधने तयार करण्यासाठी देखील वापरले जाते. त्याचे महत्त्व लक्षात घेता, दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन, २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी एपीसीसीची स्थापनादेखील झाली. तेव्हापासून, जागतिक नारळ दिवस जगभरात सातत्याने साजरा केला जात आहे.


प्रामुख्याने हा दिवस आशियाई आणि पॅसिफिक प्रदेशांमध्ये साजरा केला जातो. कारण या प्रदेशांमध्ये जगातील सर्वात जास्त नारळ उत्पादन केंद्रे आहेत. नारळाची सार्वत्रिक उपयोगिता पाहता, जागतिक नारळ दिन साजरा करणे हे त्याचे उत्पादन, महत्त्व आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ बनवण्याच्या उद्देशाने आणि त्याबद्दल जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आले आहे. हा दिवस साजरा करण्याचा आणखी एक उद्देश म्हणजे नारळाची लागवड आणि उत्पादकता वाढवणे. नारळाचा प्रत्येक भाग अतिशय उपयुक्त आणि फायदेशीर आहे. आपल्या शरीराला आवश्यक असलेले सर्व घटक नारळाच्या पाण्यात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. सरासरी नारळामध्ये सुमारे २०० मिली पाणी असते. बहुतेक डॉक्टरांच्या मते, नारळामध्ये रेडियम आणि कोबाल्ट आढळतात, म्हणूनच डॉक्टर कॅन्सरच्या रुग्णांना त्यांच्या आहारात समाविष्ट करण्याचा सल्ला देतात. याशिवाय, नारळ हृदय, यकृत, मूत्रपिंड, तोंडाचे व्रण इत्यादी आजारांपासून देखील आराम देते.

तज्ज्ञांनी रुग्णांना कोरोनाच्या काळात नारळाचे पाणी पिण्याचे सुचवले आहे, कारण त्याचे सेवन रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. नारळाच्या पाण्यात पौष्टिक पाण्याबरोबरच त्याचे कर्नल, प्रथिने, चरबी, खनिज घटक, कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि व्हिटॅमिन-सीदेखील भरपूर प्रमाणात आढळतात. जर शरीरात पाण्याची कमतरता असेल किंवा रक्ताची तरलता कमी असेल तर डॉक्टरांनी नारळाचे पाणी पिणे आवश्यक आहे.

याशिवाय अतिसार, उलटचा किंवा जुलाब झाले तरी नारळाचे पाणी फायदेशीर ठरते. आरोग्याबरोबरच नारळाच्या पाण्याचा वापर त्वचा सुंदर आणि चमकदार करण्यासाठीही केला जातो. जे चेहऱ्यावर मुरुमांच्या समस्येने त्रस्त आहेत, त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी रात्री झोपण्यापूर्वी नारळाच्या पाण्याने चेहऱ्यावर सूती घास लावून चेहरा धुवावा. यामुळे चेहऱ्याला नैसर्गिक चमक मिळते.

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : संतोष पेरणे)





**माथेरान : माथेरानच्या डोंगरात एका दगडावर स्थानिक कलाकारांनी आपल्या कलाकुसरीने निर्माण केलेला निसर्गराजा गणपती आकर्षण ठरत आहे. डोंगराच्या कपारीत आणि खोल दरीच्या बाजूला ३५ फूट उंचीचा आहे. नेरळ येथील राजाराम खडे यांनी आपले सहकारी सोपान खाडे, विश्वनाथ भोसले आणि राजीव शिंदे यांच्या मदतीने हा कड्यावरचा गणपती घडविला आहे.**



## आरोग्य प्रहर



### कोरफडीच्या रसामुळे मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत

त्वचेची काळजी घेण्यासाठी, तिचे सौंदर्य वाढवण्यासाठी तुम्ही कोरफडीचा रस बऱ्याच वेळा वापरला असेल. कोरफड ही फक्त त्वचेसाठीच नव्हे तर केसांसाठीही खूप फायदेशीर असते. आयुर्वेदातही कोरफडीच्या औषधी गुणधर्मांचे वर्णन केले आहे. कोरफडीचा वापर बऱ्याच पद्धतीने केला जातो. मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठीही कोरफडीच्या रसाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहीत आहे का? तज्ज्ञांच्या सांगण्यानुसार, रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी कोरफड उपयोगी ठरू शकते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोरफडीचा वापर कसा करावा याबद्दल जाणून घेऊया...

स्टाइलक्रेज नुसार, कोरफडीमध्ये क्रोमिअम, मॅग्नेशिअम आणि झिंकसारखे काही पौष्टिक गुणधर्म असलेले घटक इन्सुलिनचा परिणाम वाढवतात. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते. कोरफडीच्या रसामुळे मेंदूचे आरोग्य सुधारते आणि जळजळीची समस्या कमी होते.

कोरफडीचा रस घरच्या घरी तयार करता येऊ शकतो. त्यासाठी कोरफडीची पाने काढून ती स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर ती मधून कापावीत व त्यातील रस बाहेर काढून त्यात पाणी घालून मिक्सरमधून फिरवून घ्यावा. नंतर त्यामध्ये लिंबाचा रस मिसळून त्याचे सेवन करावे. मधुमेहाचे रुग्ण कोरफडीचा पावडरच्या स्वरुपातही वापर करू शकतात, तसेच कोरफडीचे आवळ्याच्या पावडरीसह सेवन करता येते. कोरफडीचा रस प्यायल्याने वजन वाढत नाही आणि मधुमेहसुद्धा नियंत्रणात राहतो. मधुमेहाच्या रुग्णांना त्वचेसंबंधी काही समस्या अथवा इन्फेक्शन झाले असेल, तर तेही कोरफडीचा रस प्यायल्याने कमी होऊ शकते.

**डॉक्टरांचा सल्ला घ्यावा :**

मधुमेहाच्या रुग्णांना एखादी जखम झाली असेल तर ती लवकर बरी होत नाही. ती ठीक करण्यासाठी कोरफडीचे जेल वापरता येऊ शकते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोरफड फायदेशीर ठरू शकते, मात्र दिनचर्येत त्याचा समावेश करण्यापूर्वी एकदा डॉक्टरांशी सल्लामसलत करावी.

# दोन अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू

## द्रुतगती मार्ग आणि मुंबई-पुणे महामार्गावरील घटना

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

द्रुतगती मार्गावर मंगळवारी (दि. ३०) पहाटे ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास दोन वेगवेगळे अपघात झाले. यात एकाचा मृत्यू झाला, तर जुन्या मुंबई -पुणे महामार्गावर पहाटेच साडेपाच वाजण्याच्या सुमारास अन्य एका अपघातात एकाचा मृत्यू झाला. या तीन अपघातात एकूण दोघांचा मृत्यू व दोन जण जखमी झाले आहेत. दरम्यान द्रुतगती मार्गावर एका मालवाहक ट्रकला अचानक आग लागली. या आगीत पूर्ण ट्रक खाक झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

लागोपाठ घडलेल्या या अपघाताच्या घटनांनी पहाटे दोन्ही महामार्गावर आपत्कालीन यंत्रणा, पोलीस प्रशासन कामाला लागले होते.

मंगळवारी पहाटे साडेतीन वाजता द्रुतगती मार्गावर पुणे लेनवरील आडोशी उतारावर ट्रकची अज्ञात वाहनाला धडक बसून अपघात झाला. यात एकाचा मृत्यू झाला, तर ट्रकचालक गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. याच दरम्यान दुसरा एक अपघात घडला. यातही एकजण गंभीर जखमी असून, त्यालाही एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. पहाटे साडेपाच वाजता जुन्या मुंबई -पुणे महामार्गावर घोडीवली फाटा येथे ट्रकच्या धडकेत कल्पेश भरत पाटील (रा. शिरपूर, जि. धुळे) या व्यक्तीचा मृत्यू झाला.

या अपघातातील मदतकार्य संपत नाही तोच द्रुतगती मार्गावर खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत मालवाहतूक ट्रकला भीषण आग लागली. नागपूरहून तळोजा येथे चाललेल्या ट्रक (एमएच ४० बीएल ७९६७)च्या केबिनला खोपोली-ढेकू गावाच्या हद्दीत अचानक आग लागली. या आगीत ट्रकची संपूर्ण केबिन जळून खाक झाली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. देवदूत यंत्रणा, मृत्युंजय देवदूत, आयआरबी पेट्रोलिंग आणि बोरघाट पोलीस यांच्या प्रयत्नाने ही आग विझवली गेली.



# प्रेम प्रकरणात तरुणाने स्वतःला घेतले पेटवून

**नागोठणे, पाली : प्रतिनिधी**

नागोठणे जवळील आंबेघर येथील प्रणय केशव बडे (वय २७) या तरुणाने सोमवारी (दि. २९) संध्याकाळी स्वतःला पेटवून घेतल्याची धक्कादायक घटना पालीमध्ये घडली आहे. त्यात तो ९० टक्के भाजल्याने त्याचा दुर्दैवी अंत झाला.

प्रणय याचे पाली येथील प्रिती (वय २६, नाव बदलले आहे) सोबत पाच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. दोघांनी लग्न करण्याचे ठरवले होते, मात्र मुलीच्या घरच्यांचा त्याला विरोध होता. सोमवारी प्रणय प्रितीच्या घरी पाली येथे गेला असता, तिच्या घरच्यांनी त्याला लग्न लाऊन देण्यास नकार दिला. त्यामुळे निराश झालेल्या प्रणयने प्रितीच्या घराबाहेर स्वतःला पेटवून घेतले. आसपासच्या लोकांनी त्याला तत्काळ पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले, तेथे डॉक्टरांनी प्रणयला मृत घोषित केले.

या प्रकरणी पाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे करीत आहेत. दरम्यान, या प्रकरणी प्रणयच्या नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त करून या घटनेची सखोल चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# गुडवण पुलाची स्थानिक तरुणांनी केली दुरुस्ती



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील चिल्हार नदीवर असलेल्या गुडवण गावाजवळील पुलावरील डांबर वाहून गेल्याने खड्डेमय रस्त्याने अनेक वर्षे वाहतूक सुरू आहे. त्याबाबत स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, मात्र बांधकाम विभाग लक्ष देत नसल्याने गुडवण गावातील तरुणांनी श्रमदान व स्वखर्चाने पुलाची दुरुस्ती केली आहे.

कर्जत तालुक्यातील बोरिवली ग्रामपंचायत हद्दीतील गुडवण गावाजवळ चिल्लार नदीवर पूल आहे. ३५ वर्षापूर्वी बांधलेल्या या पुलाची सार्वजनिक बांधकाम विभागाने एकदाही दुरुस्ती केलेली नाही. एकेरी वाहतूक करता येईल असा हा पूल असून, तो नदी पार करण्यासाठी उपयोगात आहे. या पुलाचा पृष्ठभाग खराब झाला असून अनेक ठिकाणी स्लॅबसाठी वापरण्यात आलेल्या लोखंडी सळया बाहेर निघाल्या आहेत. या पुलाची दुरुस्ती व्हावी, अशी मागणी बोरिवली आणि गुडवण ग्रामस्थ अनेक वर्षे करीत आहेत. शेवटी स्थानिक तरुणांनी स्वखर्चाने पुलाची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला.

गुडवण गावातील रामदास यशवंत खडे, रोहिदास हरिचंद्र खडे आणि संकेत यशवंत खडे या तिघांनी मजूर कामाला घेतले आणि सोमवारी (दि. २९) दिवसभर काम करून रेती, सिमेंट, प्लास्टर यांच्या सहाय्याने पुलावरील खड्डे बुजविले. व पुलाचा ६० मीटर लांबीचा पृष्ठभाग पुन्हा नवा तयार केला. त्यांच्या या कामामुळे गणेशोत्सवाच्या काळात सर्वांना पुलावरून वाहतूक करता येणार आहे.


CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## PUBLIC NOTICE

**Town Planning Scheme No. 09 (TPS-09)**

**UNDER SECTION 60(2) READ WITH SECTION 62 OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**

**No. CIDCO/NAINA/CP/BN-36/TPS-09/2022/1687**

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10 th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 01.03.2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No 12287, dated 10/01/2020, had declared its intention under sub-section (1) of Section 60 of the Act, for making Town Planning Scheme (TPS) No. 09 at part of Villages of Belavali, Borle, Chikhale, Kon and Sangade of Taluka – Panvel, District Raigad and a notice about declaration of making Scheme No. 09 has been published in the Extraordinary Official Maharashtra Government Gazette (part-II) dated 06/02/2020 as well as in the daily newspapers "Karnala" and "Krushival" in English and Marathi dated 12/02/2020 under sub-section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, vide Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act.2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the state Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded;

And whereas, such prescribed time limit is still in existence on excluding the period of lockdown declared due to spread of Covid-19 virus in the State of Maharashtra, by the Government from 23/03/2020;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No 12551, dated 02/04/2022 had delegated the powers to VC&MD, CIDCO for inclusion of additional area in declared scheme and declaring intention of making Town Planning Scheme of this additional area;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board accorded approval vide CIDCO/DP(NAINA)/TPS-9/2022/E-140917 dated 12/08/2022 for inclusion of additional area under Section 62 of the said Act, at part of Villages Bhingar, Bherle, Lonivali and Wardoli of Taluka – Panvel, District Raigad (as shown on map) in Town Planning Scheme no. 09 declared in Maharashtra State Govt. Gazette on 06/02/2020 and its declaration of intention for making of Town Planning Scheme under Sub Section (1) of the Section 60 of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub Section (2) of the Section 60 read with section 62 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme (TPS) No. 09 with additional area at part of Villages Bhingar, Bherle, Lonivali and Wardoli of Taluka – Panvel, District Raigad as shown on declaration map.

Land owners who are having valid building permission obtained from Competent Authority, falling within the boundary of proposed TPS No. 09 of part villages Belavali, Borle, Chikhale, Kon, Sangade, Bhingar, Bherle, Lonivali and Wardoli of Taluka – Panvel, District Raigad are requested to submit details of the same to NAINA office. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of Section 60(3) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the area to be included in the Town Planning Scheme No. 09 (shown by PINK border) is kept open for inspection by the public in the office of Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400 614 during office hours.

Copies of the plan showing the area to be included are also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice and plans are also available on CIDCO's website http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.

The area included in the Town Planning Scheme 09 (with additional area) is bounded as stated below;

On the North - Boundary of scheme no. 8 and Boundaries of TPS-1 (Pocket 2) and TPS-2 (Pocket 2) falling in Sangade and Belavali villages, Mumbai Pune Expressway, Panvel Karjat Railway Line.

On the East - Boundary of proposed Integrated Township Project at village Wardoli.

On the South - Boundary of IDP along Village Boundary of Sangade, Borle, Kon and boundary of MSRDC SPA along Village boundary of Ajivali and Arivali.

On the West - Boundary of scheme no. 10, falling in part of Villages Kon and Chikhale

By the order of Board of Directors of the Corporation.

(Ravindrakumar M. Mankar)
Chief Planner (NAINA)
Town Planning Scheme No. 09 (TPS-09)

Date :
Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021
CIN - U99999 MH 1970 SGC-014574

## जाहीर सूचना

**नगर रचना परीयोजना क्रमांक ०९ (टीपीएस-०९)**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६२ च्या अनुषंगाने कलम ६० च्या उपकलम (२) नुसार**

**क्र. सिडको/नैना/मु.नि/बीएन-३६/टीपीएस-०९/२०२२/१६८७**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/ सीआर -३३२/ २०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७/०४/२०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे. आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२२८७ दिनांक १०/०१ /२०२० अन्वये पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील बेलवली, सांगडे, बोर्ले, कोन आणि चिखले यांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०९ करण्याकरीता, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस - ०९ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक ०६/०२/२०२० रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्र "कर्नाळा"आणि "कृषीवल" यांत दिनांक १२/०२/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८ (अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेताना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगाच्या फैलावास किंवा आपत्ती जन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, याथास्थितो, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दि. २३/०३/२०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अजून अस्तित्वात आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२५५१ दिनांक ०२/०४/२०२२ अन्वये घोषित केलेल्या नगररचना परीयोजनेत वाढीव भागाचा समावेश करण्यासाठी आणि या वाढीव भागात नगररचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना दिले आहेत;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०२/०४/२०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून क्र. सिडको/डीपी(नैना)/टीपीएस-९/२०२२/E-१४०९१७ द्वारे दिनांक १२/०८/२०२२ रोजी, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०६/०२/२०२० रोजीच्या राजपत्रात घोषित केलेल्या नगररचना परीयोजना क्रमांक ९ मध्ये पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील भिंगार, भेरले, लोणिवली आणि वारदोली गावांच्या काही भागाच्या (नकाशात दर्शविल्या प्रमाणे) समावेशासाठी उक्त अधिनियमातील कलम ६२ नुसार मंजूरी दिली आणि उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सदर भागात, नगररचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्यास मंजूरी दिली आहे;

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६२ च्या अनुषंगाने कलम ६० च्या उपकलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील भिंगार, भेरले, लोणिवली आणि वारदोली गावांचा काही भाग (नकाशात दर्शविल्या प्रमाणे) नगररचना परीयोजना क्रमांक ९ मध्ये समावेश करून, सदर भागात नगररचना परीयोजना करण्याचा इरादा घोषित करत आहे.

प्रस्तावित टीपीएस नं. ९ मध्ये समाविष्ट रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील बेलवली, सांगडे, बोर्ले, कोन, चिखले, भिंगार, भेरले, लोणिवली आणि वारदोली गावांच्या जमिनीवर सक्षम प्राधिकारीकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन मालकांची संयुक्तीकपणे किंवा वैयक्तिकरित्या जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळविण्यास इच्छुक असतील तर त्यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसांच्या आत संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक ०९ ची घोषणा व त्यामध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या अवलोकनार्थ मुख्य नियोजनकार (नैना), ८वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध राहतील. सदर सुचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx. येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगर रचना परीयोजना क्रमांक ०९ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा (वाढीव क्षेत्रासह) खालीलप्रमाणे आहेत.

उत्तरेला - टीपीएस -०८ ची हद्द, सांगडे आणि बेलवली गावातील टीपीएस -०१ (पॉकेट २) आणि टीपीएस -०२ (पॉकेट २) ची हद्द, मुंबई पुणे द्रुतगती मार्ग, पनवेल -कर्जत रेल्वे लाईन

पूर्वेला - वारदोली गावांत प्रस्तावित विशेष नगर वसाहत प्रकल्पाची हद्द.

दक्षिणेला - सांगडे, बोर्ले आणि कोन गावांच्या हद्दी तसेच नैनाच्या अंतरिम विकास आराखड्याची सीमा व अजिवली, अरिवली गावांच्या हद्दी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. वि.नि.प्रा. ची सीमा

पश्चिमेला - टीपीएस - १० ची हद्द, चिखले आणि कोन या गावांचा काही भाग

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार.


(रविंद्रकुमार म. मानकर)
मुख्य नियोजनकार (नैना)
नगर रचना परीयोजना क्रमांक ०९ (टीपीएस-०९)

दिनांक :
नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१

www.cidco.maharashtra.gov.in | CIDCO/PR/218/2022-23


उरण : भेंडखळ येथील ऋषिकेश ठाकूर यांच्या घरातील गणेशाचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले.


तळोजा : भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांच्या घरी विराजमान गणपतीचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले.


गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, कोपर, पनवेल


उद्योगपती पी. पी. खारपाटील व उद्योगपती राजेंद्र खारपाटील, चिरनेर, उरण.


गोरेगाव (ता. माणगाव) : सचिन शिगवण यांच्या निवासस्थानी गणरायाचे दर्शन आमदार भरत गोगावले यांनी घेतले. या वेळी शिगवण कुटुंबीय उपस्थित होते.


पनवेल : काळुंद्रे येथे विशाल म्हसकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दर्शन घेतले.


भाजप जासई विभाग महिला अध्यक्ष विश्रांती घरत, चिरले, उरण


महाराष्ट्र भाजप कार्यालयीन मंत्री मुकुंद कुलकर्णी यांच्या निवासस्थानी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणरायाचे दर्शन घेतले.


पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानीही गणरायाचे आगमन झाले आहे. या गणरायाची अरुणशेठ भगत यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी रतनशेठ भगत, अजय भगत, अमृत भगत, श्रीधरशेठ भगत, प्रल्हाद भगत, जगजीवन भगत, जनार्दन भगत, गोपाळ भगत, प्रमोद भगत, रमेशशेठ भगत, रघुनाथ भगत, संतोष भगत, सुहास भगत, सुधीर भगत, निलेश भगत, भुषण भगत, प्रितम भगत, सचिन भगत, योगिता भगत, शांता भगत, विमल भगत, पुष्पा भगत, ललिता भगत, जयश्री भगत, नंदा भगत, सुशिला भगत, स्वप्नाली भगत, श्रद्धा भगत, प्रणाली भगत, समिक्षा भगत, स्नेहा भगत, शितल भगत, अंजली भगत यांच्यासह भगत कुटूंबीय उपस्थित होते.





हरिभाऊ देशमुख, पनवेल


अरुण नामदेव कोळी, गव्हाण


राजू वेदक, पनवेल


प्रथमेश हातमोडे, गिरवले, पनवेल


कर्जत : ज्येष्ठ पत्रकार वसंत ठाकूर यांच्या घरात दीड दिवसाच्या गणरायाचे आगमन झाले. या वेळी ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.


उलवे नोड : सेक्टर १७ येथील भारती सामाजिक संस्था यांच्या वतीने हनुमान मंदिर परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सवात दर्शन घेताना कवी आणि गव्हाण विद्यालयातील उपशिक्षक सागर रंधवे.


गोमुखी आळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, महाड

## भावपुर्ण श्रध्दांजली



### कै. जनाबाई चंदर रसाळ

दुःखद निधन

आई म्हणजे मंदिराचा कळस, आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस,
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी, आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं पाणी.....

दुःखद निधन

कै. जनाबाई चंदर रसाळ यांचे सोमवार दि. २९/८/२०२२ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या पवित्र आत्म्यास चिर:शांती लाभो. हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

**होम विधि :** शुक्रवार दि. २/९/२०२२ रोजी राहत्या घरी सकाळी ९.०० वाजता
**दशक्रिया विधि :** बुधवार दि. ७/९/२०२२ रोजी भोम (चिरनेर) येथे होणार आहे.
**तेरावे कार्य :** शनिवार दि. १०/९/२०२२ रोजी राहत्या घरी होणार आहे.

**शोकाकुल : समस्त रसाळ परिवार**

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्विकारले जाणार नाहीत.

## दु:खद निधन



दैनिक रामप्रहरचे प्रमुख वितरक श्री. राजेश पाटील यांच्या पत्नी

### वर्षा राजेश पाटील

यांचे बुधवार दिनांक २४ ऑगस्ट २०२२ रोजी वयाच्या ४०व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.


**दशक्रिया विधी**
शुक्रवार, दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी पनवेल परिसरातील मामेभाचे संगम येथे होणार आहे.

**उत्तरकार्य विधी (तेरावे)**
सोमवार, दि. ५ सप्टेंबर २०२२ रोजी पनवेल येथील राहत्या घरी करण्यात येईल.

**शोकाकुल**
समस्त पाटील परिवार, नवीन पनवेल

# गणेश दर्शन


दत्तात्रेय म्हात्रे, चिरनेर, उरण


रत्नप्रभा निळकर, देहेन, अलिबाग


बळीराम म्हात्रे, नवीन पनवेल


विनायक वत्सराज, पनवेल


रवींद्र पाटील, कोंडले, पनवेल


किरण रावळ, चेंढरे, अलिबाग


पी. आर. जाधव, खांदा कॉलनी


मच्छींद्र वर्तक, खांदा कॉलनी


शरद महाले, पनवेल


मिलिंद जोशी, शहाड, कल्याण


दत्तात्रेय ठाकूर, दिघोडे, उरण


साईनाथ ममताबादे व विठ्ठल ममताबादे, देऊळवाडी, उरण


किशोर नाईक, जावळे, पनवेल


शहा सोसायटी, सेक्टर ४२ ए, सीवूड, नवी मुंबई


दिनेश पवार, उरण

## लोहारे येथे माऊंटन रॅपलिंग कॅम्पद्वारे प्रशिक्षण


**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील लोहारे गावठाण येथील निलेश साळुंखे यांच्या दगडखाणीमध्ये रविवारी (दि. २८) नरवीर अ‍ॅडव्हेंचर अ‍ॅन्ड रेस्क्यू टीमच्या माध्यमातून माऊंटन रॅपलींग कॅम्प घेण्यात आला. नरवीर रेस्क्यू टीमचे मेंबर्स तसेच सिस्केप महाडचे चिंतन वैष्णव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या कॅम्पमध्ये एकूण ६५ जणांना प्रशिक्षण दिले.





## खोपोलीत पोलिसांचे वाहतूक नियोजन


बाप्पाची खरेदी सुसह्य

**खोपोली : प्रतिनिधी**

दोन वर्षांनंतर गणेशोत्सव धूमधडाक्यात साजरा होत असून, त्याच्या खरेदीसाठी खालापूर तालुक्यातील प्रमुख बाजारपेठांत मंगळवारी (दि. ३०) झुंबड उडाली होती. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांनी केलेल्या नियोजनामुळे खोपोली बाजारपेठेत गणेशभक्तांनी खरेदीचा मनसोक्त आनंद घेतला.

कोरोना निर्बंध, संसर्गाची भीती यामुळे गेली दोन वर्षे गणेशोत्सव साध्या स्वरूपात साजरा झाला होता. यंदा कोरोना आणि मंदीचे सावट दूर झाले आहे. खालापूर तालुक्यातील चौक, मोहोपाडा आणि खोपोली बाजारपेठा बाप्पाला लागणाऱ्या विविध वस्तूंनी फुलून गेल्या होत्या.

खोपोली बाजारपेठेत दीपक हॉटेल ते खालची खोपोली बँक ऑफ महाराष्ट्र मुख्य रस्ता चारचाकी तसेच रिक्षांसाठी बंद ठेवण्यात आला होता. केवळ दुचाकी आणि पादचारी ये-जा करण्यासाठी हा रस्ता मोकळा ठेवून बॅरिकेटस आणि पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले होते. त्यामुळे नेहमी वाहतूक कोंडीने त्रस्त होणाऱ्या नागरिकांना मंगळवारी खोपोली बाजारपेठेत फिरणे सुसह्य झाले होते.

## खांडस शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप


**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील दुर्गम भागातील शालेय विदयार्थ्यांच्या शैक्षणीक प्रगती व्हावी या उद्देशाने कल्याण येथील हेलपिंग हॅन्ड या सामाजिक संस्थेने कर्जत तालुक्यातील खांडस येथील प्राथमिक शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

कर्जत तालुक्यातील भागूचीवाडी प्राथमिक शाळेचे तंत्रस्नेही मुख्याध्यापक हरिचंद्र आढारी यांनी हेलपिंग हॅन्ड या संस्थेशी संपर्क करून खांडस शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन राऊत यांनी पदाधिकऱ्यांसह खांडस शाळेत येऊन पहिली ते आठवीच्या सुमारे १७५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य किटचे वाटप केले. या वेळी संस्थेचे संतोष भोईर, आझाद मुल्ला, संकेत गाडेकर, संदिप नलावडे, शाळेचे मुख्याध्यापक जगताप, आकाशदीप शिवदे, गुढवणवाडी शाळेचे शिक्षक पंढरी पाटील, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संभाजी ऐनकर, उपाध्यक्षा भारती भोईर, सामजिक कार्यकर्ते अ‍ॅड. विलास ऐनकर, भास्कर ऐनकर, समीर भोईर यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## सागवानी दरवाजांमुळे कुलाबा किल्ल्याच्या सौंदर्यात भर



**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठा आरमाराचे केंद्र राहिलेल्या ऐतिहासिक कुलाबा किल्ल्याला दोन सागवानी दरवाजे बसवण्यात आले आहेत. खाऱ्या पाण्यापासून हे दरवाजे सुरक्षीत रहावेत म्हणून यावर विशेष लेप लावण्यात आला असून या दरवाजांना ऐतिहासीक रुप देताना टोकदार खिळे, लोखंडी पट्ट्यासह चार इंचाच्या सागवानी मजबूत पट्ट्या लावण्यात आल्या आहेत.

भारतीय पुरातत्व विभागाच्या माध्यमातून या कुलाबा किल्ल्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. अलिबाग शहराच्या बाजूचा महादरवाजा आणि पाठीमागील यशवंत दरवाजा असे दोन दरवाजे बसवण्यात आले आहेत. हे दोन्ही दरवाजे नव्याने बनवण्यात आले असून यासाठी १६ लाख ५० हजार रुपयांचा निधी खर्च झाला आहे.

पुरातत्व विभागाने यापुर्वी किल्ले रायगड आणि जंजिरा किल्ल्याचे दरवाजे बसवले आहेत. हे दरवाजे जास्त काळ ठिकावेत, यासाठी त्यांना एरंडतेल आणि बिबव्याच्या तेलाचे मिश्रण लावण्यात आले आहे. या दरवाजांमुळे कुलाबा किल्ल्याच्या सौंदर्यात भर पडली असल्याने अलिबाग येथे येणारे पर्यटक कुलाबा किल्ल्याला हमखास भेट देतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**कुलाबा किल्ल्यातील दोन दरवाजांचे काम पुर्ण झाले असून, चिरे निखळलेल्या बुरुजांच्या दुरुस्तीचेही काम सुरु आहे. या बुरुजांना चार थरांचे चिरे लावण्यात आले आहेत. पावसाळा संपल्यानंतर त्याचे काम सुरु करुन काही दिवसात पुर्ण होईल. याबरोबर पुढील टप्प्यात किल्ल्यातील तलावाचे सुशोभिकरणाचेही काम हाती घेण्यात येणार आहे.**

**–बी. जी. ऐलीकर, संवर्धन सहाय्यक, पुरातत्व विभाग, रायगड**

## पळस येथे महात्मा गांधी तंटामुक्ती समितीची बैठक

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणेजवळील पळस येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत सोमवारी (दि. २९) शिवराम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तंटामुक्ती बैठक झाली. या वेळी आपल्या गावात शांतता राहण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याची अपेक्षा नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन जगताप यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात शिवराम शिंदे यांनी, गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून पळस ग्रामपंचायत तंटामुक्ती पुरस्कार प्राप्त आहे. या बैठकीला पोलीस उपनिरीक्षक नारायण चव्हाण, सरपंच परीक्षा गासे, उपसरपंच चंद्रकांत भालेकर, पप्पू वाघमारे, किसन बोरकर, निष्ठा विचारे, सुरेखा नाईक, उषा साळुंखे, सुप्रिया डाकी, हिराजी शिंदे, मारुती शिर्के, शशिकांत शिर्के, ज्ञानेश्वर शिर्के, महादेव डाकी, रामचंद्र कदम, ज्ञानेश्वर शिर्के, महादेव डाकी, रामचंद्र कदम, विक्रांत घासे, कैलास नागोठणेकर, रवींद्र पालांडे, अंगणवाडी सेविका विजया भालेकर, आशा सेविका मनीषा डाकी, कुसुम कदम, प्रतिनिधी बेबी वामन नाईक, महिला प्रतिनिधी कांचन राऊत, ग्रामसेवक बबन शिंदे आदी उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
पिनकोड–४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०
**ई–कार्यप्रणाली अंतर्गत ई–निविदा क्र. २७**
**(ऑफलाईन) सन २०२२–२३**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सुचना www.mahapwd.com पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप** – या निविदेमध्ये एकूण १२ कामे समाविष्ठ असुन ऑफलाईन निविदा विक्री दिनांक ०६.०९.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक २०.०९.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत व ऑफलाईन बीडप्रिपरेशन दिनांक २०.०९.२०२२ रोजी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/––––
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
सा.बां.विभाग, पनवेल

विमाका/कोवि/२०२२–२३ २३/१११





पनवेल : माजी नगरसेवक जगदिश गायकर व विजय दत्तात्रेय गायकर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या बाप्पाचे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी दर्शन घेतले.



पनवेल : दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. या गणरायाची पूजा व प्राणप्रतिष्ठापना अरुण घरत व भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते झाली. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, श्रीधरशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विशालशेठ ठाकूर, भारत ठाकूर, भुषण ठाकूर, प्रतिक ठाकूर, मयुर ठाकूर, नारायण ठाकूर, वैभव ठाकूर, बयोबाई श्रीधर ठाकूर, छाया ठाकूर, रजनी ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, प्रिया भारत ठाकूर, योगिता विशाल ठाकूर, पूनम भुषण ठाकूर, राहुल घरत, प्रणाली घरत, श्वेता प्रतिक ठाकूर, अमोघ ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर, अन्वी मयुर ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबीय उपस्थित होते.






पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले आहे. त्यानिमित्त अनेक सामाजिक, राजकीय तसेच इतर क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, कुणाल घरत, दर्शन ठाकूर, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उत्तर भारतीय सेलचे संयोजक विनोद ठाकूर, विपुल चौटालीया, बाबू आर. के. सिंग, नित्यरामन सिन्हा, तसेच शिवाजी नगरची कन्या आणि कलर्स मराठी या चॅनेलवरील सूर नवा ध्यास नवा या संगीत स्पर्धेत निवड झालेली श्वेता ठाकूर, आणि तिचे वडील सुरेश ठाकूर आदींनी बाप्पाचे दर्शन घेतले.





पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शेलघर, खांदा कॉलनी, बोर्ले, कामोठे, आकुर्ली, आदई सर्कल या ठिकाणी घरोघरी व सार्वजनिक मंडळांच्या वतीने बसविण्यात आलेल्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, कोन-बोर्ले ग्रुप ग्रामपंचायतीचे सदस्य घनश्याम पाटील, माजी सरपंच तुळशीराम पाटील, संदीप पाटील, भुषण गायकवाड, अरविंद धोत्रे, राहुल लोहकरे, आदर्श भगत, आशिष सिंग, पंकज प्रसाद, प्रवीण जाधव, सिद्धेश चव्हाण, सुधा सिंग आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मनोभावे दर्शन घेतले. या वेळी निलेश पाटील, सुमीत झुंझारराव, अमोघ ठाकूर यांच्यासह पाटील कुटूंबीय उपस्थित होते.




पनवेल : स्वराज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरची गल्लीच्या राजाची प्राणप्रतिष्ठापना माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाली. या वेळी मंडळाचे अध्यक्ष विनायक पाटील, उपाध्यक्ष आकाश दलाल, सचिव रिषभ मनोरे, कार्यध्यक्ष प्रांजल जगे, उपाध्यक्ष आकाश दलाल, सचिव रिषभ मनोरे, कार्य अध्यक्ष प्रांजल जगे, खजिनदार प्रतिक ठाकरे, कार्यकरणी सदस्य वैभव आंग्रे, राकेश ठाकरे, रुपेश ठाकरे, मुकेश मनोरे, बिपेश मनोरे, शेकर वडे, संदीप ठाकरे आदी उपस्थित होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com